PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 8, ISSUE 6

# छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य : प्रशासन व कार्यपद्धती

**डॉ. कैलास भरकड**
**विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद.**
**महाराष्ट्र भारत**

**डॉ. संजिव शिंदे**
**विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद.**
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :

भारताच्या इतिहासात स्वकर्तुत्वाच्या बळावर स्वराज्य निर्माण करून स्वराज्य शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवले, त्याचे सर्व श्रेय छत्रपती शिवाजी महाराज यांना जाते. मध्ययुगीन कालखंडात इ.स. १६३० ते १६८० हा काळ राजेशाहीचा असूनही तो कल्याणकारी राज्य, रयतेचे राज्य व आदर्श स्वराज्याचा काळ म्हणून ओळखला जातो. या कालखंडात भारताच्या भूभागावर वेगवेगळ्या प्रांतात आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, बरिदशाही व मोगलशाही अशा वेगवेगळ्या पाच प्रकारच्या शाही शासन व्यवस्था अस्तित्वात होत्या, महाराष्ट्र भूभागावर मोगलशाही व निजामशाहीचे अधिपत्य होते, अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः वेगवेगळ्या घटकातील मावळ्यांना एकत्रित करून स्वराज्य स्वराज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य हे लोकशाहीचे आदर्श प्रारूप मानले जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य हे कल्याणकारी राज्य होते. कल्याणकारी राज्य म्हणजे सर्व जनतेचा सर्वांगीण विकास साधणारे राज्य होय. जनतेचे कल्याण साधणे, हाच स्वराज्याचा मुख्य उद्देश होता. रयतेच्या कल्याणासाठी त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे, हे खरे स्वराज्याचे सर्वात मोठे यश म्हणता येईल. छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची उभारणीच लोकशाहीच्या भक्कम तत्त्वावर केलेली होती. शासन-प्रशासनातील भूमिकेबरोबरच न्यायव्यवस्था, सामाजिक धोरण, लोककल्याणकारी ध्येयधोरणांची पारदर्शक व प्रभावी अंमलबजावणी, शेती-पर्यावरण अशा बहुआयामी दृष्टीने कार्य केले. त्यामुळे या संशोधन पेपरचा मुख्य

उद्देश छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याची प्रशासन व कार्यपद्धतीचा अभ्यास करणे हा आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःच्या बळावर निर्माण केलेल्या राज्यास स्वराज्य म्हणत असत. राज्यातील प्रत्येक नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराजांचे शासन नियम कायदे हे आपले स्वतःचे वाटायचे, इतकेच नव्हे तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रत्येक कृतीत, नियम व कायद्यात स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्व या लोकशाही मूल्याची जोपासना होत होती व सामान्य नागरिकांना आपले जनकल्याण होईल अशा प्रकारचा विश्वास निर्माण झालेला होता त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात स्वराज्य म्हणून ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य म्हणजे स्वतःचं राज्य, स्वराज्य म्हणजेच रयतेच्या कल्याणाचं राज्य होय. अर्थात ज्या राज्यात सर्वसामान्य रयत केंद्रस्थानी ठेवून शासकीय धोरणे ठरविली जात आणि ज्या राज्यात फक्त अन् फक्त रयतेच्या कल्याणाचाच विचार केला जातो. राजाबद्दल रयतेच्या मनात आस्था व आदर असणे आणि सामान्य रयतेला वाटले पाहिजे की, हे माझे स्वतःचे राज्य आहे, असे राज्य म्हणजे स्वराज्य होय.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य म्हणजे दहशतमुक्त, कल्याणकारी राज्यव्यवस्था होय. राज्यव्यवस्थेबद्दल सर्वसामान्य रयतेच्या मनात सहानुभूती आहे आणि स्वराज्यातील शेतकरी, सामान्य रयत, स्त्रिया या दुर्बल घटकांना न्यायाची हमी आहे, असे ज्या राज्यात आहे, स्वराज्य आणि या सर्व गोष्टी स्वराज्यात अंतर्भूत होत्या हे राजांची पत्रे, आज्ञापत्रे आणि त्यांनी केलेल्या न्याय व इतर निवाड्यांतून प्रकर्षाने निदर्शनाला येतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात स्त्रिया या सुरक्षित आणि एकूणच रयत ही सुखी, समाधानी आणि संरक्षित होती, त्यामुळे त्या राज्यास स्वराज्य म्हणून ओळखले जाते. राजाशिवाय हे माझे राज्य आहे, ते मला टिकविलेच पाहिजे, त्यांचे संरक्षण केले पाहिजे. याच जिद्दीने प्रजा छत्रपती शिवाजी महाराजां सोबत व त्यांच्या मृत्यूनंतरही शिवाजी महाराजनिर्मित स्वराज्यासाठीच लढली व अनेकांनी स्वराज्य टिकवण्यासाठी आपल्या प्राण्यांचे बलिदानही वेळप्रसंगी दिले, यावरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाची आणि स्वराज्याच्या जडणघडणीतील भूमिका किती महत्त्वपूर्ण होती, हे लक्षात येते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीचे त्रिसूत्र म्हणजेच १) संघटन कौशल्य, २) दक्ष प्रशासन, ३) रयतेची राजनिष्ठा, यावरच स्वराज्याचा पाया रचला गेला आणि खऱ्या अर्थाने इ.स. १६४२ मध्ये शिवकालीन प्रशासनाचा पाया रचण्यास सुरुवात झाली आणि त्याला पुष्टी म्हणून महाराजांनी इ.स. १६४६ मध्ये स्वतंत्र राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली, ते २८ जानेवारी १६४६ च्या अस्सल पत्रावरून निदर्शनास येते. स्वराज्याला काही प्रमुख वैशिष्ट्यांच्या आधारे वेगळी अशी ओळख निर्माण झालेली दिसते. ज्यामध्ये

कल्याणकारी राज्य, उत्कृष्ट कायदा व सुव्यवस्था निर्माण करणे, याचबरोबर न्यायाची हमी, सर्वधर्म समभाव प्रशासनात सर्वांना समान संधी अशा वैशिष्ट्यांचा प्रामुख्याने यामध्ये उल्लेख करावा लागतो.

थोडक्यात, ज्या राज्यातील बहुसंख्य प्रजेला, बहुजनांना हे राज्य आपले आहे, असे वाटते, त्या राज्यास उत्तम आदर्श राज्य समजावे. स्वराज्य म्हणजे त्या प्रदेशात राहणाऱ्या नागरिकांना वाटले पाहिजे की, हे माझे राज्य आहे. अशा राज्यात जनता, शेतकरी, स्त्रिया या सर्व घटकांचे संरक्षण, न्याय, कल्याण व हित समोर ठेवून प्रशासकीय निर्णय घेतले जातात, त्या राज्यास स्वराज्य म्हणता येईल. शिवाजी महाराजांनीही स्वराज्याची स्थापना करण्यासाठी जाणीवपूर्वक असे प्रयत्न केले होते आणि म्हणूनच नवे, जनतेचे स्वराज्य स्थापन करू शकले.

**स्वराज्य : प्रशासन व कार्यपद्धती:**

छत्रपती शिवाजी महाराजांचे 'स्वराज्य' म्हणजे जगातील पहिले लोकशाही राज्य होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यातील शासन व प्रशासन हे राज तंत्रात्मक असूनही लोकशाही मूल्यावर आधारित होते. शिवरायांचे स्वराज्य हे समता, न्याय, स्वातंत्र्य व बंधुता या तत्त्वांबरोबरच, स्त्रीआदर, धर्मनिरपेक्षता, शेती व शेतकरी यांच्या कल्याणकारी धोरणाचीही प्रत्यक्ष अंमलबजावणी शिवकालीन प्रशासनात केली जात असे. छत्रपती हे स्वराज्याचे प्रमुख शासक होते, राजा व त्यांचे अष्टप्रधान मंडळ हे रयतेचे सेवक मानले जात होते.

स्वराज्याची शासन व प्रशासन यंत्रणा ही लोकशाहीच्या विकेंद्रीकृत तत्त्वावर निर्माण केलेली दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज कल्याणकारी राजा तर होतेच, त्यासोबतच स्वराज्याच्या शासनव्यवस्थेत उत्तम प्रशासक, कार्यपालक आणि न्यायपालकसुद्धा होता. कारण की, ते कायदा निर्माण करणे, तो लागू करणे आणि कायद्याची पाहणी करून कायद्याची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी झाली आहे अथवा नाही, अशी स्वतः शहानिशा करत असत, हे एका उत्तम शासनप्रमुखाचे लक्षण आहे. त्यांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य आजही जगभर प्रेरणादायी आहे. त्यामुळे प्रत्यक्ष राजेशाही असतानाही तिचे रूपांतर लोकशाहीत झाले. खऱ्या अर्थाने ती एक आदर्श शासनव्यवस्था आहे, ते खरे लोकाभिमुख राज्य होते.

छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था ही राजा केंद्रीकृत असून, सर्व अधिकार हे छत्रपतींच्या केंद्रस्थानी केंद्रित होते. स्वराज्यातील प्रशासनात मुलकी प्रशासन, लष्करी प्रशासन, जमीन महसूल व्यवस्था, आरमार प्रशासन चलन व्यवस्था, सर्व जाती-धर्मांच्या लोकांना प्रशासनात सामावून घेऊन, समान न्याय व गुणाप्रमाणे समान संधी, वतने न देण्याचे धोरण, भ्रष्टाचाराचे प्रशासनातून उच्चाटन व कार्यक्षमतेनुसार प्रशासनात

पदे दिली जात. महाराजांनी नोकरांना रोख व नियमित पगार दिले. राजा व त्यांचे मंत्रिमंडळ हे रयतेचे सेवक आहेत, हे जगात प्रथम शिवरायांनी सांगितले व अमलात आणले. ते नेहमी सांगत की, रयतेच्या गवताच्या काडीलाही इजा पोहोचविणाऱ्या राज्य सेवकास सजा देण्यात यावी... छत्रपती शिवाजी महाराजांनी समता, न्याय, बंधुता व स्वातंत्र्य या तत्त्वांची अंमलबजावणी करून खऱ्या लोकशाही राज्याची प्रचीती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनात अंतिम अधिकार हे छत्रपतींच्या हाती एकवटलेले होते; परंतु प्रशासनाच्या आणि स्वराज्याच्या सोयीसाठी काही अधिकार है झिरपत्या सिद्धान्तानुसार अष्टप्रधान मंडळात विभाग, प्रांत आणि स्थानिक स्तरावर विभागण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात ८ मंत्री होते. यांच्या अंतर्गत कार्यासाठी प्रत्येक मंत्र्यास ८ कारकून होते. ३० विभागात (१८ कारखाने आणि १२ महाल) ६०० कर्मचारी होते, अशी प्रशासकीय संरचना शिवकाळात असल्याचे दिसून येते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या राज्यकारभारात मदत करण्यासाठी त्या काळाची गरज लक्षात घेऊन आठ विभाग / खाते पाडून त्यावर एका प्रधानाची नियुक्ती केली होती. या व्यवस्थेला 'अष्टप्रधान मंडळ' असे म्हणतात. हे प्रधानमंडळ राजाला जबाबदार असून, सर्व अधिकार छत्रपतींच्या हाती एकवटलेले असत. या अष्टप्रधान मंडळाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या मंडळात मुलकी प्रशासनाला अधिक महत्त्व दिले होते. कारण यामध्ये सेनापती हा एकमेव लष्करी प्रशासनाशी संबंधित मंत्री होता, बाकीचे सर्व मंत्री हे मुलकी प्रशासन म्हणजे सामान्य प्रशासनाशी संबंधित होते. स्वराज्याचा राज्यकारभार व्यवस्थित व सुरळीत चालविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी जमीन महसुलाची पक्की व्यवस्था, सुसज्ज सैन्याची आणि आरमाराची व्यवस्था, किल्ल्यांची व्यवस्था आदी शासकीय कारभाराची आखणी करून त्याकरिता योग्य अधिकारपदे निर्माण केली आणि त्यावर सर्वोच्च अधिकारी म्हणून आठ प्रधानांचे मंत्रिमंडळ नेमले. यालाच 'अष्टप्रधान' असा शब्द प्रचलित झाला. महाराजांनी राज्यकारभाराचे आठ विभाग पाडले असून, प्रत्येक विभागावर एक-एक प्रधान नियुक्त केला होता. त्यांना अष्टप्रधान मंडळ म्हणत. या मंत्रिमंडळाला प्रशासकीयदृष्ट्या स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. ते छत्रपतींना सल्ला देणे व त्यांच्याद्वारे दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे एवढेच त्यांचे काम असे. पंडितराव व न्यायाधीश यांना वगळता इतर सर्व प्रधानांना युद्धमोहिमेवर जावे लागत असे. हे महाराजांचे अतिशय विश्वासू मंत्रिमंडळ होते कारण अष्टप्रधान मंडळाच्या कार्यकक्षेत राज्याची सर्व कार्ये अंतर्भूत होत होती.

स्वराज्यातील शासन व प्रशासन व्यवस्थेची एकूण चार मूलभूत अंगे होती. स्वातंत्र्य, समता, एकता आणि बंधुता. एका अर्थाने असेही म्हणता येईल की, 'साऱ्या विश्वाच्या कल्याणाचे एक छोटे प्रारूप त्यांनी महाराष्ट्रात उभे केले होते.' अशा राज्यात दुर्बलांना संरक्षण, प्राधान्य, आधार हे मूलतःच अभिप्रेत असते. हीच प्राथमिकता मानून शिवरायांनी कल्याणकारी राज्याचा पाया रचला. शिवरायांनी यालाच महत्त्व देऊन दुर्बलांना

'सबल' करण्यासाठी जे व्यवस्थेचा दुरुपयोग करीत आहेत, अथवा अन्यायी राजसत्तेच्या आश्रयाने वाढणाऱ्या धनिकांना शिस्त लावणे, दंडित करणे इत्यादी गोष्टी कल्याणकारी राज्यासाठी आवश्यक असतात.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात धर्म हा रयतेसाठी आहे, रयत धर्मासाठी नाही. राजा हा कोणत्याही धर्माचार्यापेक्षा श्रेष्ठ आहे. रयतेचे शोषण करणारी धर्मव्यवस्था नाकारण्याचा पूर्ण अधिकार रयतेस आहे. ब्राह्मण म्हणून विशेषाधिकार दिले, शिक्षण, शास्त्र, संपत्ती, संरक्षण दिले. सर्व बंदी उठविल्या. राजसत्ता धर्मसत्तेपेक्षा श्रेष्ठ असल्याचे दाखवून दिले. शिवकाळात गुणवत्ता पाहून नेमणुका केल्या जात असत. व्यक्तीच्या कर्तृत्वाला महत्त्व होते न की जातीला, वर्णाला, धर्माला,थोडक्यात, ते जातीनिरपेक्ष व धर्मनिरपेक्ष राज्य होते. स्वराज्यात समाजातील सर्वच जाती-धर्मांच्या लोकांना समान वागणूक मिळत असे, त्यांना प्रशासनातही समान संधी होती. स्वराज्यातील शासन, प्रशासन व्यवस्थेवर कुठल्याही एका धर्माचा, जातीचा अथवा समाजाचा प्रभाव नव्हता, तर सर्वच समाजातील जाती-धर्मांच्या लोकांना सहभागाची संधी निर्माण झालेली होती, असे दिसते.

शिवकालीन प्रशासनाची स्थापनाच ही लोकशाही तत्त्वावर आधारित होती. स्वराज्यातील सर्व जाती-धर्मांतील लोकांना स्वराज्य कार्यात सामावून घेणे, त्यांना दोन वेळची रोटी आणि त्यांचे व शेतीबाडीच्या संरक्षणाबरोबरच सामाजिक न्याय, रयतेच्या कल्याणासाठी भौगोलिक विस्तार करणे आणि त्याचा विकास करणे, यासाठी नवीन प्रशासकीय यंत्रणा व पद्धती निर्माण करणे. ज्यामध्ये स्वराज्यातील रयतेला नोकऱ्या देऊन प्रशासनात सहभागी करून घेणे, त्यांना रोख व वेळेवर वेतन देणे अशा महत्त्वपूर्ण गोष्टी शिवकालीन प्रशासनाचा आधार होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात आर्थिक धोरणांची अचूक अंमलबजावणी करत असताना त्याची फळेदेखील सर्वांना समान मिळतील, याही धोरणाकडे स्वतः लक्ष पुरविले. शेतकऱ्यांना बिनव्याजी शेतकी कर्ज, दुष्काळामध्ये कर्जाची वा शेतसाऱ्याची पूर्ण माफी, परकीय आक्रमणामुळे शेतकऱ्याला झालेल्या नुकसानभरपाईची व्यवस्था सरकारी खजिन्यातून देण्याचे धोरणही छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केले. आयात मालाच्या स्पर्धेपासून स्थानिक छोट्या उद्योजकांच्या मालाची बाजारपेठ सुरक्षित ठेवणे, आयात मालावर वा शेजारील राज्यातून येणाऱ्या मालावर अधिक कर आकारणे, अशी अनेक धोरणे महाराजांनी स्वराज्यातील रयतेच्या कल्याणासाठी आणि संवर्धनासाठी राबविल्याचे दिसते. वतनदारांचे अधिकार काढून घेऊन त्यांना पगारी नोकर केल्याने रयतेकडून मिळणारा कर आता स्वराज्याच्या राजकोषात जमा होऊ लागला. बऱ्याच गावांमधील सुलतानांच्या प्रतिनिधींना बाजूला ठेवून महाराजांनी दुर्बलांना पोषक असे नियम बनविले. युद्धामध्ये धारातीर्थी पडणाऱ्या सैनिकांच्या विधवेला आयुष्यभर अर्धे वेतन देण्याचे धोरण शिवरायांनी चालू केले. याचबरोबर

निवृत्तीवेतनाच्या विविध कल्पना आपल्या स्वराज्यात राबविण्यास सुरुवात शिवरायांनीच केली होती. अशा सर्वसमावेशक प्रशासकीय धोरणांचा अवलंब महाराजांनी स्वराज्यात केलेला दिसून येतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मिती करून ते सुराज्याच्या यशोशिखरावर पोहोचविले. शिवाजी महाराज हे एक सुजाण, कर्तव्यदक्ष व जागरूक शासक होते. त्यांनी तत्कालीन समाजव्यवस्थेतील अनिष्ट प्रथा, चालीरीती, रूढीपरंपरांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. युद्ध कैद्यांना गुलाम करण्याची प्रथा बंद केली. सतिप्रथा, बालहत्या अशा प्रथांवर बंदी घातली, विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता देऊन शिवाजी महाराजांनी आपल्या काळात दक्ष व उत्तम प्रशासन निर्माण केले. महाराजांचे धार्मिक धोरणही उदार आणि सहिष्णू होते. शिवकाळात कोणावरही अन्याय-अत्याचार होऊ दिला नाही. सर्वांना न्यायाच्या भावनेने वागवून आपले शासन हे आदर्श शासन आहे, हे दाखवून दिले.

**निष्कर्ष :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वकर्तृत्वाच्या बळावर स्वराज्य निर्माण केले, तेच मुळात सर्वसामान्य रयतेसाठी होते. स्वराज्य निर्मितीच्या सुरुवातीच्या कालखंडात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अत्यंत कोलमडलेली होती. मोघलशाही, आदिलशाही, निजामशाही यांच्या कालखंडात जाळपोळ, लुटालूट व शेतीची नासधूस केल्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य जनतेची आर्थिक घडी पार विस्कटून गेलेली होती, लोक भयभीत झालेले होते, सामाजिक जीवन अस्थिर होते, धान्याची कोठारे लुटली जात होती, रयतेवरील अन्याय-अत्याचाराने कळस गाठला होता. या जुलमी, अन्यायी परकीय सत्तांना विरोध करतानाच शिवरायांनी अगोदर राज्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसवून आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि स्वराज्यातील रयतेला सामाजिक न्यायाबरोबरच आर्थिक न्याय प्रस्थापित करून दिला आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना सर्वात प्रथम छत्रपती शिवरायांनी वास्तवात आणून दाखविली.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्यातील शासन व प्रशासन व्यवस्था ही रयतेचे कल्याण, हित, स्वराज्यातील कायदा व सुव्यवस्था, न्याय, विकेंद्रीकृत प्रशासकीय संरचना, संरक्षण व संवर्धन या घटकांवर आधारलेले दिसते. राज्यांतर्गत कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी, परकीय सत्तेपासून संरक्षण करण्यासाठी व स्वराज्याचा विस्तार केला. तसेच लष्करी सामर्थ्याचा अधिकाधिक उपयोग करून राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी, कायदा-सुव्यवस्था निर्माण केली. रयतेला सोयी-सुविधा, सवलती देण्यासाठी, राज्याच्या आर्थिक स्थितीत सुधाण्यासाठी मुलकी किंवा सामान्य प्रशासकीय व्यवस्थेत सुधारणा घडवूनआणल्या होत्या .

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्मांच्या लोकांचा सन्मान केला. प्रशासनाला सक्षम आणि मजबूत करण्यासाठी त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा वापर केला. सर्वच जातीतील जनतेला प्रशासनात सहभागी करून घेण्यासाठी त्यांच्या अंगी असणाऱ्या गुणांचा उपयोग करून घेतला. ज्यांच्या अंगी कर्तृत्व त्याला प्रशासनात त्या योग्य पदाची जबाबदारी दिली. त्यांच्या या धोरणामुळे त्यांचे साम्राज्य खूप मजबूत होऊन विस्तारित होण्यास मदत झाली. युद्धभूमीवरील त्यांच्या व्यवस्थापन तंत्रामुळे त्यांनी अनेक युद्धांत यश प्राप्त केले. महान प्रशासकीय शक्ती कौशल्य आणि रणनीतिक विचारसरणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तव्य हे महान योद्ध्याचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी देशात पहिले नौदल उभारले व सामुद्रिक संरक्षणासाठी जलदुर्गही उभारले. शिवरायांनी वतनदारी पद्धत बंद करून, अधिकाऱ्यांना वेतनधारी पद्धत सुरू केली. नोकरी देत असताना जातपात, धर्म यांचा विचार न करता गुणवत्तेवर नोकरी देण्याचे काम महाराजांनी केले. अधिकारी, कर्मचारी एकाच ठिकाणी अनेक वर्षे राहिल्यावर त्यांचे हितसंबंध निर्माण होतात, म्हणून अधिकारी, कर्मचाऱ्यांची बदली दर तीन वर्षांनी करण्याची पद्धत त्यांनी सुरू केली होती. तसेच शेतकऱ्यांचे शोषण करणारी जमीनदारी पद्धत बंद केली व शेतकऱ्यांचा फायदा असणारी रयतवारी पद्धत सुरू केली. यावरून त्यांचे शासकीय धोरण हे खूपच अलौकिक होते, हे लक्षात येते त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या राज्यास 'स्वराज्य' म्हटले जाते.

थोडक्यात, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे शासन व प्रशासन हे जनकल्याणकारी समता, बंधुत्व व न्याय या तत्त्वावर आधारलेले असल्याने स्वराज्यातील प्रत्येक नागरिकांना ते आपले वाटायचे, प्रत्येक व्यक्तीच्या मनात सुरक्षिततेची भावना असायची, तसेच शासन व प्रशासनाच्या प्रत्येक कृतीत सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग असायचा, त्यामुळे स्वराज्याला रयतेचे कल्याणकारी राज्य, व छत्रपती शिवाजी महाराजांना रयतेचा कल्याणकारी राजा म्हटले जात होते, आजही वर्तमान स्थितीत त्यांनी निर्माण केलेल्या सर्वसामान्य नागरिकांच्या मनावरील प्रतिबिंब कायम दिसून येते. त्यामुळेच आजही स्वराज्याचे महत्व प्रासंगिक आहे.

## संदर्भ ग्रंथसूची :

१) मेहेंदळे गजानन भास्कर (२००८), 'श्री राजा शिवछत्रपती', खंड-१ व २, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

२) शिखरे चंद्रशेखर, (२०११), 'प्रतिइतिहास', जिजाई प्रकाशन, पुणे.

३) दिवेकर सदाशिव महादेव, (संपा.), (१९२७), 'कवींद्र परमानंदकृत श्रीशिवभारत', शब्दवेध प्रकाशन, पुणे.

४) जाधव रमेश, (२०२०), 'स्वराज्यात कर्तृत्वाला मान, सर्व जाती समान', दैनिक दिव्य मराठी, औरंगाबाद.

५) सावंत बी.एस. आणि जाधव व्ही. के., (१९९७), 'मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास',

विद्या प्रकाशन, नागपूर.

६) रवींद्र मुंद्रे (२०१६), 'शिवाजी महाराजांचे उदार धार्मिक धोरण' Historicity Research Journal,

Volume-2 Issue-8.

७) देशपांडे पी.एन. (1971), मराठा किल्ले, मराठा इतिहासाच्या रॉयल पीरियड संदर्भात किल्ल्यांचा अभ्यास', पुणे.

८) कुलकर्णी अनुराधा (२०११), 'शिवछत्रपतीची पत्रे खंड १ व २ परममित्र 1 पब्लिकेशन्स, ठाणे.

९) बाळकृष्ण, (1940), शिवाजी द ग्रेट', (खंड - I) द ओया बुक डेपो, कोल्हापूर.

१०) कुरुंदकर नरहर (१९९६), 'छत्रपती शिवाजी महाराज जीवन रहस्य', देशमुख ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, पुणे.

११) साळुंखे गणपतराव, (२०००), शिवकालीन राज्यव्यवस्था, संजीवन पब्लिकेशन्स,सोलापूर.

१२) केळूसकर कृ.अ., (२०१६), 'छत्रपती शिवाजी महाराज, सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा. लि., कोल्हापूर.